## आदेश निशाणी ५९ खाली

(पारित दिनांक.२४/०९/२०२१)

१. अर्ज व सदर अर्जावर वादी यांनी दिलेले म्हणणे (नि.क्र ६१) चे अवलोकन केले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी नं १ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (या पुढे “संहिता”) चे आदेश १४ नियम २ पोट नियम २ प्रमाणे दिलेला आहे.

२. प्रतिवादी नं १ यांचे असे कथन आहे की, वादातील खरेदीखत हे सन २००९ मधील आहेत. परंतु प्रस्तुत दावा हा सन २००० मध्ये दाखल झाला असल्याने मुदतीत नाही. याकरिता संहिताचे आदेश १४ नियम २ पोट नियम २ प्रमाणे “वादीचा दावा मुदतीत आहे काय?” असा मुददा निश्चित करुन प्रतिवादीस म्हणजेच अर्जदार यांना पुरावा देण्याची परवानगी देण्यात यावी.

३. वादी यांनी त्यांचे कथनामध्ये प्रतिवादी नं १ यांची या अशा स्वरुपाची मागणी यापुर्वीच नामंजुर करण्यात आलेली आहे. या कारणाने पुन्हा त्या स्वरुपाची मागणी प्रतिवादी नं १ यांना करता येणार नाही.

४. वादी तर्फे या अर्जास लेखी युक्तीवाद (नि.क्र ७०) हा दि. ०६/०२/२०२१ रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं १ यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद (नि.क्र ७६) हा दि.१८/०८/२०२१ रोजी दाखल केलेला आहे. यानंतरही दि.०६/०९/२०२१ रोजी वादी तर्फे विधिज्ञ श्री.चवळे व प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री.शेटे यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही विधिज्ञ यांनी त्यांचा मौखीक युक्तीवाद हा लेखी युक्तीवादाशी सुसंगत असा केलेला आहे.

५. अर्जाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा अर्ज हा संहिताचे आदेश १४ प्रमाणे दिलेला आहे. परंतु संहिताचे आदेश १४ नियम १ प्रमाणे सर्वप्रथम वाद मुददे निश्चित करणे आवश्यक आहे. वाद मुददे निश्चित

झाल्यानंतर संहिताचे आदेश १४ नियम २ पोट नियम २ प्रमाणे वाद मुदयांमध्ये एखादा मुददा हा कायदा व वस्तुस्थिती याच्या अनुषंगाने असल्यास व न्यायालयाचे मत सदर मुददा याचे निष्कर्षावर दावा निर्णीत होउ शकेल असे झाले तर, व सदरचा मुददा हा न्यायालयाचे कार्यक्षेत्र आणि सदर दावा हा अस्तित्वात असलेल्या कायदयाप्रमाणे चालविण्यास पात्र नसेल किंवा यासी निघडीत असेल तर सदरचा मुददा हा प्रथम चौकशी कामी घेउ शकते. परंतु महत्वाची बाब अशी आहे की, प्रतिवादी नं १ यांनी या दाव्यास लेखी कैफियत दिलेली नाही. या कारणाने प्रस्तुत प्रकरणात वाद मुददे निश्चित झालेले नाहीत. उपरोक्त विवेचनावरुन प्रतिवादी नं १ यांनी कथन केल्याप्रमाणे प्रस्तुत दाव्यास संहिताचे आदेश १४ नियम २ पोट नियम २ मधील तरतुद लागु होत नाही.

६. प्रतिवादी नं १ यांनी अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे अर्ज (नि.क्र २२) वरील दि.२३/०७/२०१८ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता, माझे पुर्वाधिकारी यांनी प्रतिवादी नं १ यांची दावा मुदतीमध्ये नसल्याने संहिताचे आदेश ७ नियम ११ प्रमाणे नाकारण्यात यावा हि मागणी नामंजुर केलेली आहे. सदर आदेशामध्ये प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी नं १ यांनी नमुद केलेला न्यायनिवाडा याचाही उहापोह केलेला आहे. माझेमते अर्ज (नि.क्र २२) वरील आदेशानुसार दावा मुदतीत आहे काय? याबाबत यापुर्वीच निर्णय झालेला असल्याने तो पुन्हा विचारात घेणे उचित नाही.

७. या ठिकाणी हे नमुद करणे आवश्यक वाटते की, प्रस्तुतचा दावा हा सन २०१६ मध्ये दाखल झालेला आहे. प्रतिवादी नं १ हे न्यायालयामध्ये दि.१२/०८/२०१६ रोजी हजर झालेले आहेत. परंतु त्यांनी अद्याप पर्यंत या दाव्यास लेखी कैफियत दिलेली नाही. प्रतिवादी नं १ यांनी दिलेला अर्ज (नि.क्र २२) खाली उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे आदेश झालेला असतानाही हा अर्ज पुन्हा दिलेला आहे. प्रतिवादी नं १ यांना प्रस्तुत दाव्यामध्ये वाद मुददे निश्चित झालेले नाहीत हि बाब ज्ञात असुनही हा अर्ज

दिलेला आहे. उपरोक्त विवेचनावरुन हा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

(स.का.मुळे)

दि.२४/०९/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर,भोर, जि.पुणे.